**Q1) पुढील उताऱ्याचा आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(6)**

मिनूचे घर शेतात होते. ती खेळता खेळता घरापासून खूप दूर आली.

तिला दोन पिसे दिसली. तिने ती पिसे उचलली. तिला ती पिसे खूप आवडली. तिला वाटेत एक कोंबडी दिसली. मिनूला वाटले, ही पिसे नक्कीच कोंबडीची असणार, म्हणून तिने कोंबडीला विचारले, "कोंबडीताई, कोंबडीताई ही पिसं तुझी आहेत का ?"

कोंबडीने पिसांकडे निरखून पाहिले. "नाही गं बाई, ही पिसं माझी नाहीत," असे म्हणून कोंबडी खुराड्यात जाऊन बसली.

'कोणाची आहेत बरं ही पिसं ?' असे म्हणत मिनू एका झाडाजवळ आली. तिला झाडावर पांढऱ्या-करड्या रंगाचे एक कबुतर दिसले. त्याला पाहून मिनूला वाटले, 'याची तर नाहीत ही पिसं ?' तिने कबुतराला विचारले, "कबुतरदादा, कबुतरदादा ही पिसं तुझी आहेत का?" कबुतर म्हणाले, "नाही गं बाई, ही पिसं माझी नाहीत. "

'कोणाची आहेत बरं ही पिसं ?' या विचारात मिनू पुढे निघाली. समोरून आपला पिसारा सावरत मोर येत होता.

(1) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : (2)

(1) मिनूला दोन .......................... दिसली.
(2) झाडावर .......................... रंगाचे कबुतर दिसले.

(2) खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा : (2)

(1) मिनूला वाटेत कोण दिसली?
(2) समोरून कोण येत होता?

(3) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)

(1) मिनू कुठे आली?
(2) मिनूने कबुतराला काय विचारले?

**Q2) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(5)**

थेंब थेंब तळ्यात नाचती रे
टप्टप् पानात वाजती रे
पावसाच्या रेघात
खेळ खेळू दोघांत
निळ्या सौंगड्या नाच ।।

पावसाची रिमझिम थांबली रे
तुझी माझी जोडी जमली रे
आभाळात छान छान
सात रंगी कमान
कमानीखाली त्या नाच ।।

(1) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : (2)

(1) निळ्या ........................ नाच.
(2) पावसाची ................ थांबली रे.

TickMark.Ai

(2) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)

(1) पानावर टपटप कशाचा आवाज येतो?

(2) पावसाची रिमझिम थांबल्यावर आकाशात काय दिसू लागले?

(3) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा. (1)

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा : (5)**

**(1) खालील वाक्यात सर्वनाम ओळखून लिहा** (1)

तो अभ्यास करत आहे.

**(2) खालील वाक्यात दिलेल्या सूचनांनुसार कृती करा** (1)

'अभ्यास' या शब्दातील स्वर ओळखा.

**(3) खालील वाक्यात नाम ओळखून लिहा** (1)

मीनाकडे नवीन खेळणी आहेत.

**(4) इतर माहिती** (1)

दोन जंगलातील प्राण्यांची नावे लिहा.

**(5) अंक अक्षरात लिहा : (1)**

(1) १ -

(2) १४ -

**Q4) खालील विषयावर निबंध लिहा (कोणीही एक) : (4)**

(1) माझा आवडता खेळ

(2) माझी आई

**All the Best**

TickMark.Ai